वाचले – १. जिल्हा न्यायालयाचा कार्यालयीन आदेश क्रमांक १५१ सन २०२०.
२. मा.उच्च न्यायालयाकडील ठराव क्रमांक Resolution No.PER.GEN.SEC.(T) 1943/2020 दिनांक ३० जुलै, २०२०.

---

-: कार्यालयीन आदेश क्रमांक १५३ सन २०२० :-

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड अलिबाग हे दिनांक २४/०८/२०२० रोजी कार्यालयीन वेळेपूर्वीपासून लागू होणारे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

दिनांक १७/०८/२०२० पासून खालापूर येथे दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, तथा न्यायदंडाधिकारी वर्ग १, खालापूर हे न्यायालय कार्यान्वीत झालेले आहे. सदरहू न्यायालयासाठी जिल्हा न्यायालयाचा कार्यालयीन आदेश क्रमांक १५१ सन २०२० दिनांक १४/०८/२०२० नुसार कर्मचारी वृंद निर्माण करण्यात आला आहे. त्यानुसार सदरहू न्यायालयासाठी खालील प्रमाणे कर्मचारी वर्गाची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रतिक्षा/निवड यादीवरील उमेदवाराचे नांव व प्रतिक्षा यादीवरील क्रमांक | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री.कुणाल भास्कर पाटील, कनिष्ठ लिपीक पदाच्या प्रतिक्षा/निवड यादीवरील अ.क्र. १०४ कडील उमेदवार. | कनिष्ठ लिपीक म्हणून दुसरे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खालापूर या न्यायालयासाठी निर्माण केलेल्या कनिष्ठ लिपीक या पदावर. |
| २ | श्रीमती रोशनी बापू रामोळे, कनिष्ठ लिपीक पदाच्या प्रतिक्षा/निवड यादीवरील अ.क्र. १०५ कडील उमेदवार. | कनिष्ठ लिपीक म्हणून दुसरे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, खालापूर या न्यायालयासाठी निर्माण केलेल्या कनिष्ठ लिपीक या पदावर. |

वर नमूद कर्मचा–यांचे वेतन ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी वेतनस्तर एस – ६ रु.१९,९००/– ते रु.६३,२००/– मध्ये रु.१९,९००/– द.म.इतके निश्चित करण्यात येत आहे. त्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारे इतर भत्ते प्रदान करण्यात यावेत. त्यांना नियुक्तीचे ठिकाणी हजर होण्यासाठी कोणताही पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

त्यांची नियुक्ती पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची असून ती कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दाखविता रद्द करता येण्यासारखी आहे. तसेच उमेदवाराचे काम व वर्तन समाधानकारक नसल्यास त्यांची सेवा पुढे चालू ठेवली जाणार नाही. त्यांचेकडून त्यांच्या तात्पुरत्या सेवेबाबचे घोषणापत्र व शपथपत्र घेण्यात यावे व घोषणापत्रामध्ये तात्पुरत्या सेवेबाबतचा उल्लेख समाविष्ट करण्यात यावा. जर त्यांना सेवेचा राजीनाम द्यावयाचा असेल तर त्यांनी एक महिन्याची आगाऊ लेखी सुचना कार्यालयास

देणे आवश्यक आहे अथवा एक महिन्याचे वेतन सरकारजमा करणे बंधनकारक आहे. सदर उमेदवारांची नेमणूक ही पुढील आदेश होईपर्यंत राहील. वरील उमेदवारांनी त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वतःचा मुळ फोटो असलेले ओळखपत्र, वाहन परवाना, निवडणूक ओळखपत्र या पैकी एका दस्ताच्या मुळ व छायांकीत प्रतीसह हजर रहावे. तसेच उमेदवाराने त्यांच्या अलिकडील छायाचित्राच्या सहा प्रती, पॅनकार्ड व आधारकार्ड या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर कराव्यात.

वरील उमेदवार त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी हजर झालेवर त्यांचेकडून त्यांचे **चारित्र्य व पूर्वइतिहास यांच्या पडताळणीबाबतचा साक्षांकन नमुना, मत्ता व दायीत्वाबाबतचे विवरणपत्र** घेणेत यावे व ते जिल्हा न्यायालयाकडे दप्तरी ठेवणेकरीता त्वरीत पाठवावे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा - ४, दिनांक ३१/१०/२०१५ मधील तरतुदींनुसार नवीन नियुक्त होणा-या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू होईल मात्र महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४ आणि 'सर्वसाधार भविष्य निर्वाह निधी योजना' त्यांना लागू होणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील उमेदवार त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी दिनांक ३१/०८/२०२० रोजीपर्यंत हजर झाले नाहीत तर त्यांचे नांव प्रतिक्षा यादी/निवड यादीवरुन कमी करण्यात येईल.

संबंधीत कार्यालयांनी कर्मचारी हजर झालेबाबतचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

(विभा प्र.इंगळे)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड अलिबाग.

अलिबाग,
दिनांक - १८/०८/२०२०.

---

जावक क्रमांक प्रशा/ ३८७५ /२०२०

प्रत - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

१. मा.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खालापूर.
२. मा. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खालापूर.
३. अधिक्षक (प्रशासन), जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग.
४. सहाय्यक अधिक्षक (वित्त)जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रायगड अलिबाग.

अलिबाग,
दिनांक - १८/०८/२०२०.